# प्रसिद्धी निवेदन

**राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) 2017-18**
**इ. 8 वी साठी दि. 03 डिसेंबर, 2017 ची शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची निवडयादीबाबत**

सन 2007-08 पासून राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (NMMS) ही मिनिस्ट्री ऑफ हयुमन रिसोर्सेस भारत सरकार नवी दिल्ली यांचे मार्फत राबविली जात आहे. आर्थिक मागास विद्यार्थ्यांमधून प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या प्रज्ञेची जोपासना, तसेच त्यांचे 12 वी पर्यंत शिक्षण पूर्ण व्हावे हा या योजनेचा गाभा आहे. प्रज्ञावान विद्यार्थ्यांना दरमहा शिष्यवृत्तीच्या स्वरुपात आर्थिक मदत करण्यात येते.

सदर शिष्यवृत्ती 12 वी पर्यंत मिळते. सन 2017-18 पासून शिष्यवृत्तीचा दर दरमहा रु. 1,000/- आहे (वार्षिक रु. 12,000/-).

इ. 8 वी तील आर्थिक दुर्बल घटकातील ज्या पालकांचे उत्पन्न रु. 1,50,000/- पेक्षा कमी आहे व जे विद्यार्थी अनुदानित शाळेत शिकत असतात त्या विद्यार्थ्यांना परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारे सदर शिष्यवृत्तीचे वाटप होते.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत दि. 03 डिसेंबर, 2017 रोजी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षेची (NMMS) विद्यार्थ्यांना प्राप्त गुणांची यादी शनिवार दि. 19.05.2018 रोजी जाहीर करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना/पालकांना शाळेमार्फत जात, अपंगत्व, जन्म दिनांक इ. बाबतची दुरुस्ती असल्यास दि. 25.05.2018 पर्यंत परिषदेकडे nmms.msce@gmail.com या ईमेलवर पाठविणेबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. विद्यार्थ्यांनी/पालकांनी प्रशालामार्फत पाठविलेल्या दुरुस्त्यांचा विचार करुन **शिष्यवृत्तीसाठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांची निवडयादी सोमवार दिनांक 04/06/2018 रोजी सायं. 5.30 वाजता** जाहीर होणार आहे.

NMMS इ. 8 वी परीक्षेसाठी 79543 विद्यार्थी नोंदविण्यात आले. सदरची परीक्षा दि. 03 डिसेंबर 2017 रोजी घेण्यात आली. NMMS परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्यासाठी 11682 शिष्यवृत्ती कोटा M.H.R.D. नवी दिल्ली यांचेकडून निश्चित केला आहे. महाराष्ट्र राज्याच्या आरक्षणानुसार संबंधित संवर्गातील विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. तसेच संबंधित संवर्गात अपंगासाठीचे 3% आरक्षण समाविष्ट आहे. सर्व जिल्हयांसाठी स्वतंत्रपणे इ. 7 वी व इ. 8 वी ची विद्यार्थी संख्या व 12 ते 14 वयोगटातील संख्या यांच्या आधारे जिल्हानिहाय कोटा निश्चित करण्यात आलेला आहे. ही निवड यादी व गुणयादी **महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in व www.nmms.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर सोमवार दिनांक 04/06/2018 रोजी सायं. 5.30 वाजल्यापासून पाहता येईल.**

(कृष्णकुमार पाटील)
उपायुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे-1

E:\NEW 2012\NTS+NMMS 2017-18\NMMS Result\Presnote selected NMMS .docx